# सदैव तुमच्या सोबत.

मलबार हिल विधानसभा क्षेत्राचा आमदार म्हणून, तुमची सेवा करण्याचे भाग्य मला सातत्याने लाभले आहे. आपल्या क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीचे प्रश्न सोडवण्यासाठी 24 तास मी कार्यरत आहे. मतदारसंघातील विकासकामांच्या प्रत्येक मुद्यावर, मी तुमच्या खांद्याला खांदा लावून ठामपणे उभा आहे.

## मुंबईच्या विकासाचे पर्व

बृहन्मुंबईचा विचार करता शहराच्या पायाभूत सुविधांना अधिक सक्षम करण्यासाठी महायुती सरकारने काम केले आहे. यामध्ये मागील काही वर्षांपासून, आपल्या परिसरातील ट्राफिकची समस्या सोडवण्यासाठी मी कोस्टल रोडचे काम पूर्ण करण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले.

मागील दोन वर्षांमध्ये मंत्री म्हणून काम करत असताना, राज्यातील विविध ठिकाणी उच्च दर्जाचे कौशल्य विकास केंद्र स्थापन करून, तरुण आणि महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या त्या अन्वये त्यांच्या कुटुंबासाठी रोजगार, आर्थिक स्वातंत्र्य आणि स्थैर्य प्राप्त करून देण्याचे परम सौभाग्य मला आपल्यामुळेच लाभले आहे!

येणाऱ्या काही वर्षांत माझा भर रोजगार निर्मितीवर अधिक राहील! तसेच आपले क्षेत्र अधिक हरित करण्यासाठी, हवेचा दर्जा सुधारण्यासाठी, सुशोभीकरणासाठी आणि आपल्या कुटुंबाकरिता सुंदर अशी मैदाने उपलब्ध करून देण्यासाठी कोस्टल रोड लगत 500 एकर परिसरात सुंदर ग्रीन पार्क तयार करण्याचा आमचा मानस आहे.

## राष्ट्र प्रथम आणि धर्मो रक्षति रक्षितः

आपल्या भारताचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजी, हे अंत्योदयाचा मार्ग अवलंबून प्रत्येक भारतीयाच्या विकासासाठी मागील 10 वर्षांपासून कार्यरत आहेत. देशाला विकसित अर्थव्यवस्था असलेले राष्ट्र बनविण्यासाठी ते कार्य करत आहेत. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय विचारांचा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून मी देखील, देव, देश आणि धर्मासाठी समर्पित भावनेने कार्य करतोय! आपली भारतीय संस्कृती आपला अभिमान आहे, त्यामुळेच आपला धर्म आणि सांस्कृतिक–सामाजिक वारसा जपण्यासाठी मी नेहमीच कटिबद्ध आहे.

येणाऱ्या काळात देखील तुम्ही देत असलेल्या आशीर्वादाच्या माध्यमातून तुमची अविरत सेवा करीत राहण्यासाठी आणि मलबार हिलमधील सर्व नागरिकांच्या विकासासाठी नव्या जोमाने कार्य करण्यास मी पुन्हा एकदा उत्सुक आहे. जय महाराष्ट्र!

सदैव आपलाच,
**मंगल प्रभात लोढा**





ॲड. मंगल प्रभात लोढा, आमदार मलबार हिल
भाजप मुंबई

श्री. नरेंद्र मोदी
माननीय पंतप्रधान

माझ्यावरील आपले प्रेम आणि स्नेह व्यक्त करण्यासाठी 20 नोव्हेंबर 2024 रोजी 10 मिनिटांचा वेळ काढून, आपण मतदान करण्यासाठी जावे आणि आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे!

_____ ऑक्टोबर रोजी ________ वाजता आपल्या परिसरात भेटीसाठी येत आहे. तेव्हा आपली भेट होईल, अशी आशा आहे.

@MP.Lodha @MPLodha @Mangal Prabhat Lodha